**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात, विरोधी पक्षाच्या विविध मागण्यांमुळं कामकाजात अडथळे

- डिजिटल अटकेच्या प्रकरणांचा प्राधान्यानं तपास करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे सीबीआयला आदेश

- राज्यातल्या विविध नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी उद्या मतदान, काही ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलल्यानं राजकीय पक्ष नाराज

आणि

- नागालँडमध्ये आजपासून हॉर्नबिल महोत्सवाला सुरुवात

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत केलेल्या घोषणाबाजीमुळं दोन्ही सभागृहांच्या कामकाजात अडथळे आले. तत्पूर्वी दोन्ही सभागृहांनी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली आणि विश्वचषक जिंकणारा भारतीय महिला संघ, अंध महिला क्रिकेट संघ, महिला कब्बडी संघ आणि डेफलंपिकमध्ये पदकं मिळवणाऱ्यांचं अभिनंदन केलं. आजच्या कामकाजाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - होल्ड कॅप्सूल - -**

*(लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू झाल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. यावर बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली आणि कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन केलं. बिर्ला आवाहनानंतरही घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे सभापतींनी दुपारी १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झालं तेव्हा अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक, तंबाखू आणि तंबाखू जन्य पदार्थांवर*

*अधिभार लादण्यासाठी केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ सादर सभागृहात सादर केली. मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं. दरम्यानच्या काळात विरोधी पक्षांची घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे कामकाज तहकूब करण्यात आलं.*

*राज्यसभेत  कामकाज सुरू झाल्यावर नॅशनल कॉन्फरन्सचे गुरविंदर सिंग ओबेरॉय, चौधरी मोहम्मद रमजान आणि सज्जाद अहमद किचलू यांनी सदस्य म्हणून शपथ घेतली. पहिल्यांदाच राज्यसभेचे अध्यक्षपद भूषवणारे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांचं स्वागत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास लोकशाहीची खरी ताकद दर्शवतो असं मोदी यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना भारतीय लोकशाहीविषयी मोदी म्हणाले….*

- ***-होल्ड… बाईट - प्रधानमंत्री - -***

*राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राधाकृष्णन हे निःपक्षपातीपणे वागणूक देतील, अशी आशा व्यक्त केली. त्यानंतर विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे राज्यसभेचं कामकाजही २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी पुरवणी मागण्या सादर केल्या. याशिवाय उत्पादन शुल्क आणि आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक सादर झालं. मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्द्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी चर्चेची मागणी केली. त्यावर उत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सरकार चर्चेसाठी तयार असल्याचं म्हटलं. मात्र, या उत्तराने समाधान न झाल्यामुळे विरोधकांना सभात्याग केला. त्यानंतर शून्य प्रहर, विशेष उल्लेख झाले आणि दिवसभराचं निर्धारित कामकाज झाल्यानंतर राज्यसभेचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.)*

**<><><><><>**

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजने अंतर्गत आतापर्यंत २ कोटी ७२ लाख शिल्पकारांनी नोंदणी केली असल्याची माहिती केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि माध्यम उद्योग राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तराच्या माध्यमातून दिली.

**<><><><><>**

देशभरातलं वस्तू आणि सेवा कर संकलन गेल्यावर्षी नोव्हेंबरच्या तुलनेने यंदा सात दशांश टक्क्यांनी वाढून १ लाख ७० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं आहे. गेल्या वर्षी याच महिन्यात जीएसटी महसूल १ कोटी ६९ लाख कोटी रुपये इतका होता.

**<><><><><>**

देशभरातल्या डिजिटल अटक प्रकरणांचा तपास आज सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयकडे सोपवला. देशात डिजिटल अटक घोटाळे, गुंतवणूक घोटाळे आणि अंशकालीन कामासंबंधीचे घोटाळे या तीन प्रकारचे सायबर घोटाळे होत असल्याची माहिती, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठाला ॲमिकस क्युरिए अर्थात न्यायमित्रांनी दिली.

**<><><><><>**

दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातल्या प्रदूषणाचा मुद्दा हा दर हिवाळ्यात न्यायालयात आणायचा मुद्दा नसून यावरचे अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाय शोधण्यासाठी यावर महिन्यातून दोनदा सुनावणी घेतली जाईल, असं आज सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं. कोरोनाच्या काळातही शेतातला कचरा जाळला जात होता, पण तरीही आकाश निरभ्र दिसत होतं. त्यामुळे, या प्रदूषणामागे इतरही काही कारणं असू शकतात, असं निरीक्षण सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं नोंदवलं. या प्रकरणाची पुढची सुनावणी १० डिसेंबर रोजी होणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या २२२ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार आज रात्री १० वाजता संपेल. काही ठिकाणच्या निवडणुका मात्र पुढे ढकलण्यात आल्यानं राजकीय पक्षांनी नाराजी व्यक्त केली आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यानं विविध पक्षांच्या नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. दरम्यान, मतदानाच्या तयारीसाठी अधिकारी-कर्मचारीही आपापल्या मतदान केंद्रांवर पोहोचले आहेत. या निवडणुकीचं मतदान उद्या, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी*

*होणार आहे. या मतदानासाठी उद्या, २ डिसेंबर रोजी संबंधित ठिकाणी सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली आहे.*

*दरम्यान, राज्यातल्या २४ नगरपरिषद, नगरपंचायतींमध्ये तसंच विविध ठिकाणच्या १५४ नगरसेवक पदासाठी २० डिसेंबरला मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांमध्ये २३ नोव्हेंबर किंवा त्यानंतर निर्णय आल्यानं राज्य निवडणूक आयोगानं हा निर्णय घेतला आहे. सुधारित कार्यक्रमानुसार आता १० डिसेंबरला दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील. अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी आणि निवडणूक चिन्हांचे वाटप ११ डिसेंबरला होईल आणि २० डिसेंबरला सकाळी साडे ७ ते संध्याकाळी साडे ५ दरम्यान मतदान होईल. मतमोजणी २१ डिसेंबरला सकाळी १० वाजता सुरू होईल. या २४ नगरपरिषद, नगरपंचायतींमध्ये अंबरनाथ, कोपरगाव, देवळालीप्रवरा, पाथर्डी, नेवासा, बारामती, फुरसुंगी, उरुळी देवाची, अनगर, मंगळवेढा, महाबळेश्वर, फलटण, फुलंब्री, मुखेड, धर्माबाद, निलंगा, रेणापूर, वसमत, अजंनगाव सूर्जी, बाळापूर, यवतमाळ, वाशीम, देऊळगावराजा, देवळी आणि घुग्घूस यांचा समावेश आहे.*

*निवडणूक पुढे ढकलण्याच्या या निर्णयाला राजकीय पक्षांनी विरोध केला आहे. निवडणुका स्थगित करायचा राज्य निवडणूक आयोगाचा हा निर्णय चुकीचा आहे, असं **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** म्हणाले. हा निर्णय इतर उमेदवारांवर अन्याय करणारा असून तो कायद्याला धरून नाही, असं ते म्हणाले.*

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस***

*निवडणूक प्रक्रिया स्थगित न करता सुरू ठेवाव्यात, अशी मागणी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष **रवींद्र चव्हाण** यांनी राज्य निवडणूक आयुक्तांकडे पत्राद्वारे केली. **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** यांनीही हा निर्णय चुकीचा असल्याचं मत व्यक्त केलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष **हर्षवर्धन सपकाळ** यांनीही या निर्णयावर टीका केली. मतदान एका दिवसावर आलेलं असताना २० नगरपालिका आणि काही प्रभागांमधल्या निवडणुका पुढं ढकलायचा निर्णय आश्चर्यकारक आणि अनाकलनीय असून आयोगाचा भोंगळ कारभार सुरू आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.)*

**<><><><><>**

नागालँडची राजधानी कोहिमा इथल्या किसामा इथं आज २६व्या हॉर्नबिल महोत्सवाची सुरुवात झाली. नागालँडचे गव्हर्नर अजय कुमार भल्ला, मुख्यमंत्री नेईफिऊ रिओ यांनी महोत्सवाचा औपचारिक प्रारंभ केला. नागालँडच्या राज्यदिनाबरोबरच सुरू होणाऱ्या या १० दिवसांच्या महोत्सवात विविध नागा समुदाय एकत्र येऊन परंपरा, लोककला, संगीत, कला आणि अन्नसंस्कृतीचा आनंद लुटतात. या महोत्सवात यावर्षी युनायटेड किंगडम, आयर्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, माल्टा आणि स्वित्झर्लंड हे सहा भागीदार देश आहेत.

<><><><><>

इंडोनेशिया मध्ये सुरु चक्रीवादळानंतर आलेला पाऊस, महापुर आणि भूस्खलनाच्या घटनांमुळं गेलेल्या बळींची संख्या ६०० वर पोचली आहे. त्या व्यतिरिक्त अन्य ५०० नागरिक अद्याप बेपत्ता असून सुमारे १ हजार नागरिक जखमी झाल्याचं वृत्त आहे.

<><><><><>

ऑपरेशन सागर बंधू अंतर्गत दितवा चक्रीवादळाचा फटका बसलेल्या श्रीलंकेला भारतानं ५३ टन मदत साहित्य पोहोचवलं आहे. याशिवाय, तंबू, पांघरुणं, तयार अन्नपदार्थ, औषधं, वैद्यकीय साहित्य यासह आणखी साडे एकतीस टन मदत साहित्य, भारतीय हवाई दलाच्या तीन विमानांद्वारे पाठवण्यात येणार आहे. तसंच एनडीआरएफसह विविध पथकांकडून मदत आणि बचावकार्य सुरू आहे.

//<><><><><>//